# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## कर निर्धारकव संकलक विभाग

(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील प्रकरण ८ कराधान नियम यातील नियम ५,१३,१५,१६,२० व २१ अन्वये )

# जाहीर नोटीस

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका महासभेने ठराव क्रं. १ दि.०६/०४/२०१३ अन्वये सदर ठरावातील अ.नं.६ मध्ये नमुद केले प्रमाणे भांडवली पध्दतीने कर आकारणीची अमंल बजावणीची प्रक्रिया सन २०१३-१४ पासुन सुरु करणेत आली आहे. सदर पध्दतीने प्रमाणात आकारणी करुन बिले देण्यात बराच कालावधी लागणार आहे.त्यामुळे उक्त कायद्यातील कलम १२९ (एक)(१) नुसार मागील वर्षाच्या मिळकत कर मागणी बिला प्रमाणे तात्पुरत्या स्वरुपाने अंतरिम बिल म्हणूनच देणेत येणार आहेत.

दरम्यान सांगली मिरज आणि कुपवाड महानगरपालिका हद्दीतील मालमत्ता कर आकारणी पुस्तक सन २०२१-२०२२ ची यादी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील प्रकरण ८ कराधान नियम यातील नियम क्रं ९ खंड (अ)(ब)(क)(३)अन्वये आवश्यक असलेल्या आकारणी यादीत व्यवहार्य असतील तिथपर्यत सुधारणा करुन तयार करणेत आलेली आहे. कर वसुली सुलभ व्हावी यासाठी उक्त कराधान अधिनियमांतील नियम २१.(१) अन्वये सांगली मिरज कुपवाड विभागाच्या निकटपूर्वीच्या वर्षाच्या (म्हणजेच सन २०२१-२०२२ ) पुस्तकांतील नोंदी नंतर प्राप्त दुरुस्त्या मागणी नुसार आवश्यक नियमानुकल बदलासह अंतिम नोंदी म्हणून सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षा करीता कर आकारणीसाठी स्विकारल्या आहेत.

सदर मालमत्ता कर आकारणीच्या तात्पुरत्या स्वरुपात वापरावयाच्या नोंदी महानगरपालिकेच्या कर निर्धारण व संकलन खात्याच्या खालील विभागीय कार्यालयात (मालमत्तांच्या नोंदी) मिळकतीच्या मालकी हक्काच्या/भोगवटदाराच्या नावासह मिळकत/भोगवटदार यांना कार्यालयीन वेळेत (सुट्टयाखेरीज ) (१०ते४) पहण्यासाठी उपलब्ध आहे.तसेच सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर देखील उपलब्ध् आहेत

**१). सांगली - मंगल धाम कार्यालय जिल्हा परिषद समोर पुष्पराज चौक सांगली**

**२). मिरज - मिरज विभागाच्या महानगरपालिकेची मुख्य इमारत.**

**३). कुपवाड - नवीन प्रशासकीय इमारत. कुपवाड.**

ज्या मिळकत धारकांना/भोगवटदारांना मिळकत कर आकारणी पुस्तका मधील नमुद केलेल्या कर योग्य मूल्याच्या रकमेविरुध्द निवेदन करावयाचे असेल त्यांनी आपले निवेदन सबळ कारणांसह लेखी स्वरुपांत निम्न स्वाक्षरीदार यांच्या नांवे सांगली विभागीय कार्यालयात,मिरजेतील नागरीकांना मिरज विभागीय कार्यालयात कुपवाड विभागातील नवीन प्रशासकीय इमारत येथील कार्यालयात सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून २१ दिवसाचे आत सायंकाळी ४.०० वाजेपर्यत अगर तत्पूर्वी मिळतील अशा रितीने समक्षांत आणून द्याव्यात अथवा टपालाने पाठवाव्यात. मुदतीनंतर येणा-या तक्रारीचा विचार केला जाणार नाही.

सन २०२१-२०२२ या अर्थिक वर्षातील थकबाकीसह मालमत्ता कराची संपूर्ण रक्कम ज्या मिळकतधारकांनी भरणा केली आहे. त्यांच्याच निवेदनाचा विचार केला जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

सांगली मिरज आणि कुपवाड महानगरपालिका महासभा ठराव क्रं ८६ दिनांक २०/०१/२०२१ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १४० ड अन्वये मालमत्ता धारकाने (१) सौरऊर्जेचा वापर करणे (२) गांडूळ खत प्रकल्प राबविणे (३) रेनवॉटर हार्वेस्टिंग करणे (४) होम कंपोस्टींग करणे (५) सांड पाण्याचा निचरा करणे या पाच बाबी पैकी तीन बाबींची पूर्तता केल्यास त्या मिळकतीस सामान्य करात ४% सवलत देय आहे.तसेच इलेक्ट्रीक वाहन करीता चार्जिंग स्टेशन उभारल्यास मिळकत करा मध्ये शासन निर्णयानुसार २% सवलतीचा लाभ घेणे व माजी सैनिक विधवा पत्नी , शौर्यपदक धारक यांना महापालिका हद्दीतील कोणत्याही एका मिळकतीच्या मालमत्ता करामध्ये सवलत देणे बाबत सर्व नागरीकांना आवाहन करणेत येत आहे.

महापालिका क्षेत्रात ( सांगली/मिरज/कुपवाड विभाग ) ज्यांनी नव्याने इमारत उभी केली असेल अथवा असलेल्या इमारतीच्या क्षेत्रांत वाढ केलेली असेल परंतु त्यांचे अशा मालमत्तांना महापालिकेकडून मालमत्तांची कर आकारणी करणेत आलेली नाही अशा सर्व मालमत्ताधारकांनी ,भोगवटधारकांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ कराधान विषयक नियम ५ नुसार आयुक्तास २१ दिवसांच्या आत लेखी कळविणे बंधनकारक आहे. मग त्यांनी केलेले बांधकाम हे अधिकृत अगर अनअधिकृत, कायदेशीर अथवा बेकायदेशीर कोणतेही असेल तरी त्यावर मालमत्ता कराची आकारणी ही महापालिकेकडून केली जाते. यासाठी अशा सर्व मालमत्ताधारकांनी जाहिर नोटीसीची दखल घेवून केलेल्या बांधकामाची माहिती योग्य त्या कागदपत्रासह महापलिकेस २१ दिवसाचे आत लेखी स्वरुपात द्यावी.तसेच महापालिका स्थळ सिमेतील ज्या मिळकती कायम स्वरुपी बंद आहेत.अशा मिळकत धारकांनी रेमिशन मिळणे करीता १ एप्रिलला अर्ज करणे बंधनकारक आहे.

मोकळया भुखंड धारकांनी आपले भुखंड विषयीची माहिती २१ दिवसाच्या आत महापालिकेकडे लेखी स्वरुपात द्यावी म्हणजे त्यावर कर आकारणी करणे सुलभ होईल.

दि - ०६/०७/२०२२

६.७.2022

( नितिन कापडणीस )
आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिक